# सुट्ट्या नसलेली दप्तररहीत शाळा

स्पिक अँड स्पॅन कॉन्व्हेंटची आणखी एक खासियत आहे शाळेला फारच थोड्या सुट्ट्या आहेत.  म्हणून विद्यार्थी म्हणतात दप्तर आणि सुट्ट्याच नाहीत आमच्या शाळेला.

राखी, पोळा, नागपंचमी, ईद, मोहरम, गुडफ्रायडे, ख्रिसमस, गुरुनानक जयंती, शिवाजी जयंती, पारसी न्यु ईयर डे इत्यादी सुट्ट्यांच्या दिवशी स्पिक ॲण्ड स्पॅन ही शाळा पूर्ण दिवस भरते.  इतके फायदे अनुभवले आम्ही सुट्ट्या न देऊन. काय साध्य होतं जयंतीला सुट्टी देऊन ? त्यापेक्षा शाळेत या थोरामोठ्यांचे चरित्र वाचू द्या आणि सत्कारणी लावा ना तो दिवस.

इतर सणांच्या दिवशी अर्धा दिवस विद्यार्थी घरीच असतात.  करा ना तो सण साजरा, नाही कोणं म्हणतं. पण पूर्ण दिवस सुट्टी देऊन त्यांची अभ्यासातली गती खंडित होते याचे भान असू द्या.  काही पालक जाम खूष आहेत आमच्या "सुट्ट्यांना नकार" या योजनेला, ते म्हणतात काय करतात हो हे विद्यार्थी घरी ? फक्त दिवसभर TV बघतात आणि Gadgets ला चिकटलेली असतात. बरं झालं सुट्ट्या देत नाही तेच छान आहे.

दिवाळीच्या सुट्ट्यानंतर विद्यार्थी परत येतात, त्यांना अभ्यासाच्या मूड मधे परत आणणं म्हणजे फार मोठ दिव्यच असतं आमच्यासाठी.  अहो दिवाळीच्या १५ दिवस सुट्ट्या देत नाही तेच छान आहे.

निवडणूकीच्या दिवशी सुट्टी दिली. माझा जीव इतका दुःखी होता, त्या दिवशी विद्यार्थ्यांच अतोनात नुकसान झालं, पण कुणी ही साधा विचार सुध्दा केला नाही याचा.

आपले लाडके पूर्व राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी घालून दिलेला आदर्श "माझा मृत्युदिवस एक तास जास्त काम करुन लक्षात ठेवा" हा त्यांचा आग्रह होता.   ह्या तत्त्वालाच आपण का विसरतो ?

"शाळेचा दर्जा" हे फार मोठं आव्हान आम्ही स्विकारलय.  मग आम्ही

सुट्टयांच्या दिवशी घरी बसून दर्जा कसा टिकवणार ?

आमचे ८, ९, १० चे वर्ग संपूर्ण उन्हाळाभर सुध्दा सकाळी भरतात. ट्यूशन्स उन्हाळ्यात सुरु असतात मग शाळेलाच का सुट्टी ? आणि खरच पालकांनी सुध्दा दुजोरा दिला आमच्या 'उन्हाळ्यात शाळा' या विचाराला. आमच्या या उपक्रमाद्वारे अस वाटतं की आमच्या देशाला कधीही या पुढे सुट्टयांचा देश असं दूषण लागणार नाही.

पालक बारा महिन्यांची शाळेत फी भरतात मग विद्यार्थ्यांना इतक्या सुट्टया का ? याचा जाब ते का विचारत नाहीत ?

आणि हीच नैतिक जबाबदारी आम्ही स्विकारली आणि सुट्टयांना नकार दिला.

काही चुकलं का आमचं ?